सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२३, मुंबई, दिनांक ११/१०/२०२४

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन गृह विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-१०२४/प्र.क्र.१९२/विशा-३ (अ), दि.१० ऑक्टोबर २०२४

**विषय :-** पुणे शहर येथील पोलीस अधिकारी व अमंलदार यांनी समर्थ पोलीस स्टेशन, गु.रजि.नं.३८/२०२४ एन.डी.पी.एस.अ‍ॅक्ट कलम ८ (क) २२ (क), २९ या गुन्ह्याबाबत बजावलेल्या विशेष कामगिरी करीता रु.२५ लाख बक्षीस रक्कम मंजूर करणेबाबत

******

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-१०२४/प्र.क्र.१९२/विशा-३ (अ), दि.१० ऑक्टोबर २०२४ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२४१०१०१८४४४४९३२९असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयनुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उप सहायक(र.व.का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,
पोलीस आयुक्त, पुणे शहर
कार्यासन अधिकारी, का.क्र. ३१

प्रत,
पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके "आस्थापना" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.



Scanned with CamScanner

**पुणे शहर येथील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी समर्थ पोलीस स्टेशन, गु.रजि.नं. ३८/ २०२४ एन.डी. पी. एस. ॲक्ट कलम ८ (क), २२ (क), २९ या गुन्ह्याबाबत बजावलेल्या विशेष कामगिरी करीता रू.२५ लाख बक्षीस रक्कम मंजूर करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-१०२४/प्र.क्र.१९२/विशा-३(अ)**
मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय,मुंबई-४०००३२
तारीख: १० ऑक्टोंबर,२०२४

<u>वाचा :-</u>

पोलीस आयुक्त,पुणे शहर,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचे पत्र क्र.पोउआ/गुन्हे/समर्थ ३८-२०२४/ उत्कृष्ट कामगिरी बक्षिस/६८१/२०२४,दि.२४.०४.२०२४ .

<u>प्रस्तावना :-</u>

पुणे शहर पोलीस दलातील गुन्हे शाखेमधील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी पुणे जिल्ह्यातील कुरकुंभ, विश्रांतवाडी, धानोरी व सांगली जिल्ह्यातील कुपवाड तसेच इतर राज्यातील पटना बिहार, पश्चिम बंगाल, दिल्ली या ठिकणी एकत्रीतरित्या छापा कारवाई केली.तसेच सदर कारवाई मध्ये मोठ्या प्रमाणत अंमली पदार्थ जप्त केला आहे.

अंमली पदार्थ विरोधी मोहीमे अंतर्गत प्रभावी व उत्कृष्ठ कामगिरी पुणे शहर पोलीस आयुक्तालयाचे गुन्हे शाखेने केली आहे. सबब, सदर कामगिरीची नोंद विशेषत्वाने घेऊन पुणे शहर पोलीस दलातील गुन्हे शाखेमधील पोलीस अधिकारी व अंमलदार यांना बक्षीस स्वरूपात रू.२५ लाख रक्कम देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय:-</u>

पुणे शहर पोलीस दलातील गुन्हे शाखेमधील पोलीस अधिकारी व अंमलदार या संवर्गातील अधिकारी व कर्मचारी यांनी अंमली पदार्थाबाबत केलेल्या कारवाईबाबतच्या कामगिरीची नोंद विशेषत्वाने घेऊन त्यांना बक्षीस स्वरूपात रूपये २५ लाख इतका निधी वितरीत करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. सदरहू निधी पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांनी पोलीस आयुक्त, पुणे शहर यांना वितरीत करावा आणि पोलीस आयुक्त, पुणे शहर यांनी सदरहू रक्कम पोलीस अधिकारी व पोलीस कर्मचारी यांना अदा करावी.

३. उपरोक्त प्रयोजनासाठी येणार खर्च मागणी क्र.बी-०१, २०५५ -पोलीस, (००)(१०९) जिल्हा पोलीस, (००) (०१) जिल्हा पोलीस बल, (अनिवार्य) दत्तमत (२०५५ ०१६८) ०५ ,बक्षिसे या अतंर्गत या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकून तो सन २०२४-२५ या आर्थिक वर्षातील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

४. सदर निधी आहारित करण्यासाठी पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई हे “नियंत्रण अधिकारी” तसेच त्यांच्या अधिनस्त कार्यालय पोलीस आयुक्त पुणे शहर “आहरण व संवितरण अधिकारी” राहतील.

५. सदर शासन निर्णय वित्त विभाग, वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८ भाग -पहिला, उप विभाग-तीन , अ.क्र. ४ परिच्छेद क्र.२७ (२) मध्ये प्रशासकीय विभागाला दिलेल्या अधिकारातर्गंत निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२४१०१०१८४४४४९३२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SWAPNA NILESH DESHPANDE

Digitally signed by SWAPNA NILESH DESHPANDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, 2.5.4.20=8f33d110713d529fd14cadb7107a7a56252382926dfbbe68e0ce49aae150e1e8, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=F68C2CBBE864D14D120F29960E8E60D5C00E2D614E6A0234A132D68EADBD05CC, cn=SWAPNA NILESH DESHPANDE
Date: 2024.10.10 18:35:44 +05'30'

**( स्वप्ना देशपांडे )**
**अवर सचिव,महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) पोलीस आयुक्त,पुणे शहर
३) जिल्हा पोलीस अधिक्षक. पुणे
४) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई.
५) महालेखापाल, (लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई.
६) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
७) मा.अपर मुख्य सचिव (गृह) यांचे स्वीय सहायक
८) मा. प्रधान सचिव (अपील व सुरक्षा) यांचे स्वीय सहायक
९) मा.प्रधान सचिव (विशेष) यांचे स्वीय सहायक
१०) निवडनस्ती/विशा-३(अ),गृह विभाग,मंत्रालय,मुंबई.